# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यता प्राप्त युनियन

मित्रहो,

कर्मचारी संघटनेने MOU-2004 संदर्भात मा. चेअरमन यांना आंदोलनासंबधीचे पत्र दिले होते. त्या पत्रास अनुसरुन मॅनेजमेंटने दिलेल्या आश्वासनांनुसार दिनांक ११ जूलै २०१७ रोजी MOU-2004 Review Committee ची बैठक देहराडून येथे संपन्न झाली. कर्मचारी संघटनेने 2015 साली मॅनेजमेंटला दिलेला प्रस्ताव साधारणपणे मध्यवर्ती धरुन सर्व मान्यताप्राप्त युनियन्सची मॅनेजमेंट सोबत दिवसभर चर्चा झाली.

सर्वप्रथम JAT च्या SPAN बाबत चर्चा झाली. 2004 च्या MOU नुसार आयटीआय प्रमाण प्रत्रक धारक कर्मचाऱ्यांचे 3 वर्षांचे नुकसान झालेले आहे, त्यापैकी आपल्या प्रस्तावाप्रमाणे 3 वर्षे कमी करण्यावर सर्व युनियन्स ठाम राहिल्या. त्यावर मॅनेजमेंटने 2 वर्षे कमी करण्यास सहमती दर्शविली त्यास सर्व युनियन्सनी विरोध केला. त्याचप्रमाणे JAT (Rigman) यांना A-II लेवलला आणण्याच्या प्रस्तावावर सर्व युनियन्स ठाम असताना मॅनेजमेंटने त्यांच्या प्रमोशन SPAN मधील 5 वर्षे कमी करण्याचा प्रस्ताव दिला तो सर्व युनियन्सनी अमान्य केला.

जेवणाच्या सुट्टीनंतर A-II लेवल कर्मचाऱ्यांच्या प्रमोशन SPAN बाबत सर्विस्तर चर्च झाली. सर्व मान्यताप्राप्त युनियन्सनी 18 वर्षांपैकी 9 वर्षांचा SPAN कमी करण्याचा प्रस्ताव दिला. त्यावेळी मॅनेजमेंटने एवढा मोठा SPAN कमी करण्यास स्पष्टपणे असमर्थता दर्शविली. चर्चेअंती मॅनेजमेंटने सर्व युनियन्सच्या जनरल सेक्रेटरीजना विनंती केली कि, यातून जर सुवर्णमध्य काढायचा असेल तर तुम्हीसुध्दा आपल्या म्हणण्यावर ठाम न रहाता तडजोडीची भुमिका घ्यावी. त्यानंतर सर्व जनरल सेक्रेटरीजनी आपआपसात चर्चा करुन एकूण 18 वर्षे SPAN मधील 9 वर्षे कमी करण्याऐवजी 8 वर्षे कमी करण्यास सहमती दर्शवून सुधारीत प्रस्ताव सादर केला. त्यावर मॅनेजमेंटने एकूण 18 वर्षे SPAN पैकी 5 वर्षे कमी करण्याची तयारी दर्शविली. यास सर्व मान्यताप्राप्त युनियन्सच्या जनरल सेक्रेटरीजनी आक्षेप घेत सदर प्रस्ताव अमान्य केला. रात्री 9.00 वाजेपर्यंत मिटींग सुरु होती. शेवटी मॅनेजमेंटने सर्व युनियन्सना विनंती केली कि, इतर सर्व JAT - 2 वर्षे, JAT (Rigman)- 5 वर्षे व A-II कर्मचाऱ्यांची 5 वर्षे कमी करण्याचा जो मॅनेजमेंटने दिलेला प्रस्ताव आहे त्यावर फेरविचार करुन पुढिल मिटींगमध्ये अंतिम निर्णय घेण्याबाबत सहकार्य करण्याची विनंती केली.

आजपर्यंत MOU-2004 संदर्भात जेवढ्या मिटींग्ज झाल्या त्या तुलनेत सदर मिटींग ही अतिशय सकारात्मक झालेली असून निश्चितपणे अंतिम निर्णयाकडे वाटचाल करणारी आहे. MOU-2004 मुळे ज्या नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांची ओएनजीसीतील एकूण संख्या तसेच येत्या 3-4 वर्षात सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागी नव्याने भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्यात खदखदत असलेला असंतोष याबाबतची पुरेपूर कल्पना कर्मचारी संघटनेने वेळोवेळी मॅनेजमेंटला करुन दिलेली आहे. तसेच इतर कंपन्यांमध्ये डिप्लोमाधारक कर्मचाऱ्यांच्या पदनामामध्ये टेक्नीशियन ऐवजी इंजिनियर असा उल्लेख व्हायलाच पाहिजे याबाबतही वेगवेगळ्या कंपन्यांच्या कागदपत्रांसहीत पुर्तता करीत मॅनेजमेंटला सादर केलेले आहेत.

वरील परिस्थिती मॅनेजमेंटसमोर असताना देखिल या मिटींग पूर्वी जी MOU-2004 संदर्भात मिटींग झालेली होती त्या मिटींग मध्ये मॅनेजमेंटने A-II लेवलचा SPAN केवळ 2 वर्षे कमी करण्याचा प्रस्ताव देण्याचा खोडसाळपणा केलेला होता. त्याचवेळी कर्मचारी संघटनेने जाहीर केले की सुसंवाद आणि वार्तालाप यांचे मार्ग संपलेले असून आता आपल्याला रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्यावाचून दूसरा पर्याय नाही. आणि त्याप्रमाणे कर्मचारी संघटनेने जुलै 5,6,व 7 रोजी ॲक्शन प्लान थेट चेअरमन साहेबांना कळविला होता. यामुळे मॅनेजमेंटने जलद हालचाली सुरु केल्या. अर्थात याचा अर्थ असा नाही की आपण जे मागू ते सर्व मॅनेजमेंट मान्य करेल. त्यामुळे तुटेपर्यंत ताणून हाती काहीच न लागण्यापेक्षा मिळालेल्या संधीचा वापर करुन कर्मचा-यांना जास्तित जास्त फायदा करुन देण्याचा कर्मचारी संघटनेचा यापुढिल पवित्रा असणार आहे.

**रास्त व न्याय्य तसेच तर्कसंगत कारणांशिवाय कर्मचारी संघटना कधीच आंदोलन करीत नाही आणि तशीच कारणे असतील तर आंदोलन करण्यास घाबरतही नाही.** हा इतिहास मॅनेजमेंटला चांगलाच परिचित आहे. तसेच कामगारांमध्येही MOU-2004 संदर्भात कामगारांमध्ये जो असंतोष आहे तो रास्त असून त्यांना न्याय देण्याकरीता **कर्मचारी संघटना** रस्त्यावर उतरणार आहे याची पूर्णपणे जाणिव मॅनेजमेंटला आहे तसेच कर्मचारी संघटनेमागे असलेली राजकीय ताकद व कामगारांचा संघटीत पाठिंबा याची सुध्दा मॅनेजमेंटला कल्पना असल्याने आंदोलन होण्यापूर्वीच तातडीने मिटींग लावून वरीलप्रमाणे प्रथमच एवढा सकारात्मक प्रतिसाद व्यवस्थापनाने दिलेला आहे.

वर लिहिल्याप्रमाणे जरी मॅनेजमेंट सकारात्मक असली तरी सदर मिटींगमध्ये अंतिम निर्णय न झाल्यामुळे पूर्वी ठरल्याप्रमाणे कर्मचारी संघटना मॅनेजमेंटला त्वरीत आपला ॲक्शन प्लान देत असून सर्व कर्मचाऱ्यांनी एकजूटीने हा आपला ॲक्शन प्लान यशस्वी करावा असे कर्मचारी संघटनेतर्फे आवाहन करण्यात येत आहे. मात्र वरवर पाठिंबा देण्याचा देखावा करीत याचेही राजकरण करुन या प्रामाणिक उदिष्टांना कापण्याचे पाप जर कोणी करीत असेल तर त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याचेही आवाहन करीत आहे.

MOU-2004 संदर्भात पुढिल कारवाई निश्चित करण्यासाठी कर्मचाऱ्यांची दि. 20 जुलै 2017 रोजी सभा आयोजित करण्यात आलेली असून सर्वकष चर्चा करुन नंतरच कर्मचारी संघटना आपला अंतिम निर्णय मॅनेजमेंटला सादर करील. कर्मचाऱ्यांच्या प्रमोशन मधील जो SPAN कमी होणार आहे तो Retrospective असावा ही कर्मचारी संघटनेची प्रमुख मागणी असून त्यामुळे कर्मचाऱ्यांना चांगला लाभ मिळणार असून 2017 चे पे-रिव्हीजन व पुढिल R&P या सर्व जमेच्या बाजू पहाता इतर कंपन्यांच्या तुलनेत आपण ONGC मध्ये नोकरी करीत असल्याचा आपल्याला निश्चितपणे अभिमान वाटेल यात तिळमात्र शंका नाही.

**कामगार एकता झिंदाबाद !**
**कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

**प्रदीप मयेकर**
( सरचिटणीस )

दि. 15 जुलै 2017